# ध्येय निश्चिती.

**ध्येय निश्चिती**–आज आपल्याकडे नसलेली क्षमता, योग्यता म्हणजेच गुणवत्ता, शिक्षण इत्यादी मिळवण्याची इच्छा, आकांक्षा ठेवणे व त्यासाठी दृढ संकल्प करणे म्हणजेच ध्येय निश्चिती करणे.

याच आधारे आपल्याला पुढे काय बनायचे आहे म्हणजेच कोणत्या क्षेत्रत करीयर करायचे आहे हेही ठरवता येईल.

आणि त्यासाठी १०वी–१२वीत किती टक्के गुण मिळवणे आवश्यक असते ते मिळवणे हे होईल आपले ध्येय.

भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम म्हणतात –
'स्वप्ने विचारांना जन्म देतात, विचार कृतिला जन्म देतात व कृतिमुळेच स्वप्ने साकार होतात म्हणून मित्रंनो स्वप्ने बघा स्वप्ने...'

पुढे ते असेही म्हणतात–'स्वप्ने म्हणजे आपण झोपेत बघतो ती नव्हेत तर ज्याने झोपच उडून जाते ती स्वप्ने!'

वर सांगितल्याप्रमाणे आपण ठरवलेल्या ध्येयांचे मूळ अशा प्रकारच्या स्वप्नांतच असते.

- **पहिले पाऊल ध्येय शिखराच्या दिशेने -**

'टर्निंग पॉईंट' या पुस्तकातील 'ध्येय निश्चिती' हे प्रकरण लक्षपूर्वक वाचा. त्यातील माहितीच्या आधाराने आपले ध्येय निश्चित करा व ते संक्षिप्त रुपात पुढील पानावर लिहा.



**जर तुमच्याकडे भव्य स्वप्नांचे यान,**
**महत्वाकांक्षेचा उपग्रह,**
**प्रबळ ईच्छाशक्तिचे इंधन,**
**व कठोर परिश्रम नावाचा चालक**
**असेल तर अमर्याद यशाच्या अवकाशात**
**तुम्ही पोहचलाच म्हणून समजा !**

**हम होंगे कामयाब...!**